ISBN 978-81-949979-5-5

काव्यसंग्रह

कल्पनेचे पंख

सौ. वर्षाराणी राजाराम सावंत

कवितासागर साहित्य अकादमी, जयसिंगपूर
02322 - 225500, 9975873569, 8484986064

KavitaSagar Sahitya Akademi
(KavitaSagar Direct Publishing)
कवितासागर साहित्य अकादमी, जयसिंगपूर

- **I**nternational **S**tandard **B**ook **N**umber: **978-81-949979-5-5**
- Title - **Kalpaneche Pankh कल्पनेचे पंख** (काव्यसंग्रह)
- Edition - **First**
- Volume - **One**
- Price - **Rs. 250/-**
- Pages - **100 + 08 = 108** (Including Covers)
- Language - **Marathi**

ISBN 978-81-949979-5-5

9 788194 997955

- Poetess - **Mrs. Varsharani Rajaram Sawant**
  Kolhapur Galli, At and Post - Sainik Takali - 416108, Taluka - Shirol, District - Kolhapur, Phone - 8459758816, 9922811182

- Subject - **Collection of Poems**
- Year of Publication / Date of Issue - **31 December 2023**
- Book Version - **Paperback**

- Published by - **Dr. Sunil Dada Patil**
  Publisher Agency - **KavitaSagar**
  Imprint - **KavitaSagar Sahitya Akademi,**
  Post Box Number - 69, Jaysingpur - 416101,
  Taluka - Shirol, District - **Kolhapur**, Maharashtra, **India**
  02322 - 225500, 9975873569, sunildadapatil@gmail.com

- Printed in India by - **Dr. Sunil Dada Patil**
  On behalf of the **KavitaSagar Printing Services**

कल्पनेचे पंख

(काव्यसंग्रह)

अर्पण पत्रिका

१८ जवान शहीद होऊनही
नियमित सैन्यात भरती होण्याची
परंपरा जपणाऱ्या माझ्या 'सैनिक टाकळी' या
मातृभूमीस, आजी माजी सैनिक तसेच,
माझे वडील कै. ह. भ. प. हरीभाऊ पाटील
व माझे सासू सासरे यांच्या पवित्र स्मृतीस,
माझ्या काव्यलेखनास स्फूर्ती आणि
प्रेरणा देणारे कै. श्री वसंत तुळपुळे महाराज,
तसेच साहित्य रसिक, नातलग आणि
हितचिंतक यांना हा काव्यसंग्रह समर्पित.

- सौ. वर्षाराणी राजाराम सावंत

मनोगत

'कल्पनेचे पंख' हा माझा पहिलाच काव्यसंग्रह रसिक वाचकांच्या हाती देताना मला अत्यानंद होत आहे.माझे काव्य हे विविध विषयांवरील असून, ते भावनिक, काल्पनिक, प्रेमळ, जिव्हाळयाचे व हृदयस्पर्शी आहे. सहज, सोपी आणि बोली भाषा वापरून ही काव्यरचना केली आहे. ती आपल्याला नक्की आवडेल याची मला खात्री आहे.

माझ्या 'कल्पनेचे पंख' या काव्यसंग्रहाला रंग, रूप, आकार आणि वळण देण्यासाठी, यथोचित संस्कार करण्याकरिता कवितासागर साहित्य अकादमी, जयसिंगपूर या मुद्रण आणि प्रकाशन संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. सुनील दादा पाटील आणि मुद्रक सौ. संजीवनी सुनील पाटील या दांपत्याने अत्यंत अनमोल आणि प्रभावी सहकार्य केले.

मला कविता लिहिण्याची पहिली प्रेरणा मिळाली ती लेखक श्री. मनोहर महादेव भोसले यांच्याकडून. उपजिल्हाप्रमुख श्री. मधुकर बचाराम पाटील आणि श्री. व सौ. रंजना पांडुरंग मोहिते यांचे विशेष सहकार्य मिळाले. मला समर्थपणे साथ देणारे माझे पती श्री. राजू सावंत आणि माझी तिनही मुले प्रिया, भाग्यश्री आणि शंतनु यांची मला मोलाची साथ मिळाली. माझे हे स्वप्न खरेतर आज त्यांच्यामुळेच साकार झाले.

माझे १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले आणि लग्न झाले. संसारात रममाण होऊन संसारातील जबाबदाऱ्या समर्थपणे पेलण्यात व्यस्त असलेली मी एक गृहिणी आहे. पण मी माझा कविता लिहिण्याचा छंद वेळ मिळेल तसा जोपासला. घर- संसार, मुले, नातलग हेच काय ते माझे विश्व. इतर गृहिणीप्रमाणे मी ही माझी सर्व कर्तव्ये पार पाडत असते. पण दैवाने मला अशी एक कला बहाल केलीय की मी एखाद्या प्रसंगाकडे, निसर्गाकडे, सुख -

दु:खाकडे वेगळया दृष्टिकोनातून पाहू शकते. ते प्रसंग, त्या घटना जेव्हा काळजात घर करतात तेव्हा त्या कविता बनतात.

माझे ‘काव्यगंध’ नावाचे युट्यूब चॅनेल ही आहे. डिजीटल मार्केटिंगमधील 'महाशाळेचे महागुरू' श्री. योगेश महामुनी सर यांच्या सहकार्याने ते चालू झाले. आज ते चॅनेल ही छान भरारी घेत आहे.

त्यामुळे 'कल्पनेचे पंख' हा काव्यसंग्रह आणि 'काव्यगंध सौ. वर्षा सावंत' हे युट्यूब चॅनेल मराठी रसिक मनावर निश्चित राज्य करेल अशी मी आशा व्यक्त करते.

- सौ. वर्षाराणी राजाराम सावंत
Phone - 8459758816, 9922811182

आशावादी कवितासंग्रह: कल्पनेचे पंख

विज्ञान सांगते की, ध्वनीच्या वेगापेक्षा प्रकाशाचा वेग जास्त आहे पण प्रकाशाच्या वेगापेक्षा कवीच्या कल्पना वेगवान असतात म्हणूनच 'जे न देखे रवी वो देखे कवी' असे म्हटले जाते.

कल्पनेचे पंख लाभलेली माणसे स्वतः आनंदी असतातच; पण, दुसऱ्याच्याही आयुष्यात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. अशापैकी एक कवयित्री सौ. वर्षाराणी राजाराम सावंत. त्या मुळच्या सैनिक टाकळी गावच्या रहिवाशी आहेत. माणसाच्या आयुष्यामधील अविस्मरणीय क्षण आपल्या कॅमेऱ्यामध्ये टिपणारे फोटोग्राफर पती श्री. राजू सावंत आणि मुलांसोबत त्या सध्या जयसिंगपूर शहरामध्ये राहतात.

लहानपणापासूनच त्यांना वाचन, लेखनाची आवड असल्यामुळे वाचता - वाचता जे सुचले ते त्यांनी कागदावर मांडले. परिसरातील कवी संमेलनामधून, साहित्य संमेलनामधून तर कधी वर्तमानपत्रके, दिवाळी अंक यामधून आपल्या कविता मांडल्या. मित्र - मैत्रिणी, पती, मुलं, मुली आणि एकंदरीत घर परिवाराने प्रेरणा दिल्या. यातूनच 'कल्पनेचे पंख' हा पहिला कवितासंग्रह आला.

कल्पनेचे पंख या कवितासंग्रहामधील अनेक कविता अस्वस्थ करतात त्यातूनही कवयित्री वाचकाला आश्वस्त करते हे कवितेचे आणि कवयित्रीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. कितीही विचित्र परिस्थिती असली तरी अशा सोडलेली नाही. सगळं काही व्यवस्थित होईल चांगलं होईल अशी अपेक्षा ठेवलेली आहे.

देव, देश, आई, वडील, कुटुंब, नातेसंबंध यासह काही सामाजिक प्रश्न कवितेच्या माध्यमातून मांडले आहेत. वास्तव स्पष्टपणे मांडलेले असले तरी कल्पना हळुवार मांडल्या आहेत. या कल्पना गरुडांचे पंख लावून भरारी घेणाऱ्या नव्हेत तर नाजूक फुलपाखरासारख्या नाती, मातीवर बसून लुकलुकणाऱ्या आहेत.

'कल्पनेचे पंख' या काव्यसंग्रहामध्ये मोकळा श्वास, जिवंतपणाचे जिणे, मनमुराद जगण्यासाठी, सुख - सुख म्हणताना या कविता माणसाला आनंदाने जगायला शिकवतात. पैसा म्हणजे सगळं काही नाही पैशाशिवाय मिळवण्यासाठी अनेक गोष्टी आहेत याकडे 'पैसा' या कवितेतून

लक्ष केंद्रित केले आहे. थकलेल्या हातांना आधार, आई - वडिलांचे स्वप्न, केसावर भांडी या कवितेमधून आई - वडिलांच्या कष्टाकडे मुले करत असलेले दुर्लक्ष मांडले आहे. पोटासाठी, काहीतरी म्हणावं या कविता कष्टकरी माणसाच्या हाल अपेष्टा व्यक्त करतात. 'एक होते इर्शाळवाडी गाव' या कवितेच्या माध्यमातून डोंगराखाली दडपल्या गेलेल्या गावाची तत्कालीन नोंद ठेवली गेली आहे.

आई मला जन्म दे, का नको मुलगी, मुलगी जेव्हा मोठी होते या कवितेमधून मुलीचे महत्त्व सांगत विषय मांडला आहे. एवढेच नव्हे तर स्त्री आहेस तरी कोण तू, एक दिवस तिचाही, अरे संसार संसार, वाव मिळू दे या कविता महिलांना, मुलींना वाव देण्याची गरज व्यक्त करतात. 'कल्पनेचे पंख' या संग्रहामधली 'तुझ्यातली तू' ही कविता ‘कल्पनेचे पंख’ या शीर्षकाला सार्थ ठरवते.

जुन्याच काही स्वप्नांमध्ये
रंग नव्याने भरायचे
मरगळलेल्या मनाला
नव्याने उत्साहित करायचे

अशा आशयाची 'पुन्हा नव्याने' ही शेवटची कविता वाचकाला समाधानी बनवते. बदल हा घडत नसतो तो आपल्याला घडवावा लागत असतो. ही सिख हा सबक कवयित्रीने शतशः वंदन करूया शिवरायांचे मावळे चिलखत सैनिकांचे सैनिक माझ्या बांधवांना सैनिकी परंपरेचे अशा कवितेमधून दिला आहे.

'कल्पनेचे पंख' या काव्यसंग्रहामधल्या सांग लेकरा, आई - वडिलांचे स्वप्न, कसला बदल, आधुनिक महाभारत, मोकळा श्वास या कविता स्टार प्लस आहेत.

'त्यानेही एकदा म्हणावे' ही कविता अतिशय सुंदर व प्रेमळ आहे. पुन्हा पुन्हा वाचावी. एखाद्याला वाचून दाखवावी अशी आहे.

ताट भरून वाढले तरी
सतत त्याला विचारते
अजून काय हवे
एकच अपेक्षा असते
तू ही बस माझ्यासवे

त्यांनीही एकदा म्हणावे

सौ. वर्षाराणी राजाराम सावंत या एक प्रतिभावंत कवयित्री आहेत. त्यांची वैचारिक पात्रता आभाळाला गवसणी घालणारी आहे. विचार आणि आचार श्रेष्ठ असावेत असे सांगणाऱ्या त्या कवयित्री आहेत. प्रत्येक कविता वाचनीय आणि चिंतनात्मक आहे. त्यांचा प्रत्येक शब्द तोलामोलाचा आहे. कवयित्रीच्या मनाचा आरसा म्हणजे त्यांचा 'कल्पनेचे पंख' हा पहिला काव्यसंग्रह आहे.

सर्व प्रथम जेव्हा मी त्यांच्या कविता वाचल्या तेव्हा त्यांच्या विषयी काय लिहावे हा प्रश्न पडला. कारण त्यांनी त्यांच्या मनाची कवाडे प्रत्येक कवितेत उघडली आहेत. त्यांना मला सांगावेसे वाटते की, तुम्ही सतत लिहा. त्यांच्या अशा काही कविता आहेत की, त्या वाचकाला विचार करण्यास प्रवृत्त करतात.

मुक्तछंदा मधल्या साध्या, सरळ, सोप्या भाषा शैलीच्या कविता वाचकाच्या मनाला भावतात. शीर्षकाला अनुसरून असलेले मुखपृष्ठ आकर्षक झालेले आहे. पुस्तकासाठी वापरलेला चांगला कागद, उत्कृष्ट छपाई, मजबूत बाईंडिंग यामुळे ही पुस्तकाला दर्जा प्राप्त झालेला आहे. निश्चितच कवयित्री सौ. वर्षाराणी राजाराम सावंत यांच्याबरोबरच सदर पुस्तकाचे मुद्रक आणि प्रकाशक डॉ. सुनील पाटील अभिनंदनाला पात्र आहेत. त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

- कवितासंग्रह: **कल्पनेचे पंख**
- ISBN **978-81-949979-5-5**
- कवयित्री: **सौ वर्षाराणी राजाराम सावंत**
- प्रकाशन: **कवितासागर साहित्य अकादमी, जयसिंगपूर**
- संपर्क: 9975873569, 8484986064, 02322 - 225500

शब्दांकन: **मनोहर भोसले (मनुदा)**
सैनिक टाकळी

(सदर अभिप्राय देणाऱ्या लेखकाचा इ. ५ वीच्या बालभारती पाठ्यपुस्तकांमध्ये 'कठीण समय येता' या शीर्षकाचा पाठ समाविष्ट आहे.)

अनुक्रमणिका

कल्पनेचे पंख १३

मातीचं नातं १४

फुलपाखरू १६

शब्द १७

गंध मातीचा १८

माझ्या कवितेनं १९

जन्म मिळत नाही पुन्हा - पुन्हा २०

केसांवर भांडी, सुई, फणी ईकताना २१

ठेवा रे मनाले साफ २३

मन २४

उंच भरारी गगनाची २५

आजीची कहाणी २६

मोकळा श्वास २७

जिवंतपणाचे जिणे २८

आई मला जन्म घेऊ दे २९

काय तरी म्हणावं ३१

पैसा.. ३२

अमृतापरी देणे.. ३३

एक होतं इर्शाळवाडी गाव.. ३४

शतशः वंदन करूया.. ३६

मनमुराद जगण्यासाठी.. ३७

थकलेल्या हातांना आधार.. ३८

अशा आमुच्या देवा.. ४०

आई.. ४१

बाप म्हणजे.. ४२

किती गंमत असते ना नात्यात!.. ४३

कविता.. ४४

वाव मिळू दे.. ४८

ईश्वराचे दान.. ५०

स्त्री आहेस तरी कोण तू...?.. ५१

हे मना, एकदा मजसाठी गाशील का?.. ५५

भूतलावर आहे जोवर.. ५६

पोटासाठी.. ५७

कसला बदल........ ५८

आधुनिक महाभारत........ ६०

एक दिवस तिचा ही........ ६२

कवितेशी मैत्री........ ६४

का न सुंदर जीवन जगावे........ ६५

ध्येय........ ६६

माझे जगणे........ ६७

तुझ्यातली तू........ ६८

नशीबाचं लक्तर........ ६९

मुका जीव........ ७०

अनुभवाचे चित्र........ ७१

मी........ ७२

अरे संसार - संसार!........ ७३

का नको मुलगी........ ७५

मुलगी जेव्हा मोठी होते........ ७६

त्याने ही एकदा म्हणावे........ ७७

दुःख अनावर झालं तेव्हा........ ७९

माय - लेकरू ८१

एकदा तरी वळवून बघ ८२

हे धरणी माय ८४

सैनिकी परंपरेचे गाव (सैनिक टाकळी) ८५

सांग लेकरा ८७

पाषाणी देव ८९

म्हणून तुझ्याकडे धाव घेतली ९१

तिथेच असते परीक्षा ९३

जीवावरच ओझं ९४

सैनिक माझ्या बांधवांना ९५

चिलखत सैन्याचे ९६

सुख - सुख म्हणताना ९७

शिवरायांचे मावळे ९८

पुन्हा नव्याने ९९

Official Allotment of ISBN Number १००

कल्पनेचे पंख

कल्पनेचे पंख लावून
घेतली मी उंच भरारी
कल्पनेच्याच नजरेने
पाहिली दुनिया सारी

कल्पनेनेच घेतले
क्षितिजापलीकडले पाहून
कल्पनेनेच पाहिला
समुद्रतळ ही शोधून

कल्पनेनेच घेतल्या
मनातल्या इच्छा जाणून
कल्पनेनेच आनंद शोधला
कल्पनेतच घेतले स्वतःला वाहून

कल्पनेनेच दिली
लेखणीला धार
कल्पनेनेच रेखले
काव्य सुंदर, नक्षीदार

कल्पना करून - करून
गेले कल्पनेतच रंगून
कल्पनेसारखा आनंद
नाही मिळाला कुठेच शोधून

मातीचं नातं

पूर्वी असायची
मातीचीचं घरं
आणि
कौलारू छप्परं

सारवणाच्या वेळेला
मातीचा उठणारा सुगंध
मन मोहवून टाकायचा
तो मातीचा गंध

फुटलेल्या कौलातून
येणारा कवडसा
झालेली वेळ
बरोबर सांगायचा

हिवाळयात मिळायची
ऊब मातीची
उन्हाळयात वाऱ्याची
झुळूक आत यायची

संपत गेली ती माणसं
संपत गेली माती
सिमेंट कॉंकरिटच्या वाढत गेल्या
उंचच उंच इमारती

रजईचं ऊबदार पांघरूण
ए. सी. कुलरचा वारा
नाही मिळत पण त्यात
निसर्गाचा आस्वाद न्यारा

झाडांची जंगलं गेली
इमारतीचं जाळं पसरलं
माणसानं माणसातलं
माणूसपण विसरलं

नकळत यायला हवाय
तो नात्यातला ओलावा
मिळायला हवाय विसरलेला
मातीचा दुरावा

फुलपाखरू

सहज वाटेने जाता - जाता
चुकून पडली तिकडे नजर
एका फुलावरती बसले होते
फुलपाखरू ते मनोहर

इवल्याश्या त्या आपुल्या मुखाने
मध फुलातील शोषित होते
सुंदर आपुल्या सौंदर्याने
फुलालाही लाजवीत होते

निसर्गाचा चमत्कार की,
कोणी चित्रकाराने घडविले होते
सुंदर नाजूक पंखामध्ये
उडण्याचेही बळ होते

शब्द

शब्द असावे फुलासारखे
मनामध्ये गंधाळणारे ।
शब्द असावे मधासारखे
जिभेवरती रेंगाळणारे ।।

शब्द असावे मृदू पण
पाषाणाला पाझरवीणारे ।
शब्द असावे लवचिक पण
पोलादाला झुकवीणारे ।।

शब्द असावे असे सुंदर
सौंदर्याची खाण मनोहर ।
शब्द असावे असे परखड
निर्भिडतेची साक्ष कणखर ।।

गंध मातीचा

प्रेम मीलनातून कसा दरवळला
गंध मातीचा सांगून गेला ।

तप्त झालेल्या मातीला
पावसाची ओढ होती ।
त्याच्या येण्याची वाट पाहत
अंग - अंग जाळीत होती ।।

पावसाला ही ओढ लागली
मातीच्या प्रेमाची ।
काळया - काळया ढगांमधूनी
इच्छा झाली बरसण्याची ।।

हळूहळू कोसळू लागला
मातीमध्ये मिसळून गेला ।
या दोघांच्या प्रथम मीलनातून
गंध मातीचा दरवळू लागला ।।

प्रेम मीलनातून असा दरवळला
गंध मातीचा सांगून गेला ।।

माझ्या कवितेनं

माझ्या कवितेनं, माझं बनून कधी न रहावं
दु:खीतांचे अश्रू पुसत, तिने नित्य जगावं

कधी निराधाराचा आधार बनावं
तर कधी खचलेल्या मनाचा, निर्धार बनावं

तिन जळणाऱ्या मनाला, फुंकर घालून विझवावं
तिनं अश्रू ढाळणाऱ्या मनाला, हसवून रिझवावं

मुक्या असणाऱ्या जिवाचे, शब्द बनून बोलावं
पंगुतांचे अंग होऊन, चंदनापरी झिजावं

अन्यायाविरुद्ध शस्त्र होऊन,लढत रहावं
अत्याचाराविरुद्ध, प्रक्षोभ बनून उसळावं

माझ्या कवितेनं, माझं बनून कधी न रहावं
नेहमीच तिनं, दुसऱ्यासाठी फुलावं

जन्म मिळत नाही पुन्हा - पुन्हा

जीवन जगावे आनंदाने पुन्हा - पुन्हा
कारण, जन्म मिळत नाही पुन्हा - पुन्हा

जीवनाच्या वळणावरती रंग उधळावे
इंद्रधनूचे पुन्हा - पुन्हा ।
दु:खाच्या आयुष्याला
सुखी बनवावे पुन्हा - पुन्हा ।।१।।

अंधारात उजळावी प्रकाशज्योत
चांदण्यांची पुन्हा - पुन्हा ।
उन्हाच्या झळांना लपेटुन घ्यावे
सावल्यांनी पुन्हा - पुन्हा ।।२।।

नित्याचीच ठरली हार तरीही
प्रयत्न करावे पुन्हा - पुन्हा ।
अंध:काराच्या कुशीतूनी
उष:काल होतो पुन्हा - पुन्हा ।।३।।

केसांवर भांडी, सुई, फणी ईकताना

केसांवर भांडी,सुई
फणी ईकताना
बघायचं व्हत तिला
पोराला शिकताना

रणरणत्या उन्हात
कोसळत्या पावसात
नाही तमा बाळगली
जरी झाली दुखापत

एकच ध्यास
ठेवला उरात
शिक्षण देऊन पाहीन
मोठा माणूस त्यात

त्या पोराला आईची
कळत नव्हती तळमळ
पाहताच तिला
दूर जाई पळपळ

घरी येऊन आईला
बोल बोलायचा लेक
मित्र असता संगती
दाखवू नको वळख

घृणा वाटती मला
तुझ्या या कामाची
लाज वाटती मला
तुला आई म्हणण्याची

कसा ऊरपाटा झाला
पोटचा लेक
शिकण्यासाठी त्याच्या
केला दिसरात एक

मन तिचं कोलमडलं
रडं - रडं रडलं
पोराच्या बोलण्यानं
झालं अर्धमेलं

तरीबी आईच्या काळजाला
मोठा माणूस दिसत व्हता
त्यानं नाही मानलं आई
तरी तिचा तो पोरगाचं व्हता

ठेवा रे मनाले साफ

नाशवंत हा देह
किती कौतुके सजविला
जणू करीचे बैलाले
रेशमी झूला पांघरला

सावळ्या रंगाले
गोरा करु पाहीयला
दुष्ट येणाऱ्या विचाराले
तसाच जागविला

अंतरंग गढूळलेले
कधीच साफ नसे
वरलीया रंगाले
कोण पुसत बसे

ठेवा ठेवा रे मनाले
साखरेवाणी गोड
साफ मनाले नाही
दुसरी कसलीच तोड

मन

वढाळ वासराला
जसं नाय
कुणाचही भय
मनाच्या या पक्षाला
बांधायला
हाय का काय?

उनाड ते हाय
दरी खोऱ्यातून फिरतंय
हाय हाय म्हणेपातर
डोंगराच्या
पल्याड ते जाय

कळत नाय ते
कवा जाय
चंद्र - सूर्याला बिलगाय
कवा देवांच्या
पंक्तीला
बसल अमृत प्याय

उंच भरारी गगनाची

उंच भरारी गगनाची
मजला घेऊ दे
निळया - निळया ढगांमध्ये
बेधुंद नाचू दे

नाही तेथे हेवे दावे
नाही ईर्षा द्वेष
मन मोकळे होऊनी
स्वैर फिरू दे

निरागस पक्षांची
मैत्री करू दे
अवकाशाची गाणी गात
वाऱ्यासंगे झुलू दे

चमचमणाऱ्या ताऱ्यांच्या
गोष्टी ऐकू दे
शांत अशा चांदोबाशी
दोस्ती करू दे

आजीची कहाणी

एक होता राजा नी
एक होती राणी
आटपाट नगरातली
ही आजीची कहाणी

नातवंडे सारी गोळा करूनी
आजीची रंगत जायची कहाणी
राजाचे ते पराक्रम ऐकूनी
मुले म्हणायची.....
आम्ही ही दाखवू शूर होऊनी

राणी ही होती शूर - वीरांनी
तिच्या शौर्याच्या कथा ऐकूनी
परकर पोलक्यातल्या मुली
सज्ज व्हायच्या
कमरेला तलवार खोवूनी

आजीची ही कहाणी
गेली आज भूतकाळात विरूनी
अभ्यासाच्या ओझ्याखाली
गेले बालपण दबूनी

मोकळा श्वास

प्रत्येकाचे जीवन म्हणजे
एक कथा असते
प्रत्येकाच्या आयुष्यात
वेगळीच व्यथा असते

प्रत्येकाच्या कुवतीने
जो तो जगत असतो
आपल्या आपल्या परीने
आपली व्यथा सोडवत असतो

झुंज ही प्रत्येकाला
ठरलेलीच आहे
फक्त पाठीवर हात फिरवून
लढ! म्हणणारेचं हवे आहे

लढता - लढता प्रत्येकालाच
जगायचे आहे
जगता - जगता कुठे तरी
मोकळा श्वास घ्यायचा आहे

जिवंतपणाचे जिणे

जिवंतपणी जाळीले मरण यातनेने
मरणानंतर कशास हवे
अश्रू टिपणे ।।

एकाकी असता सगेसोयरे लांब ठेवणे
मृतदेहावर कशास हवे
गोतावळे जमविणे ।।

आयुष्यभर दिले कपडे जुने पुराणे
सरणावरती कशास हवे
कफन नवे पांघरणे ।।

सतत जगत ठेवले जिणे ओंगळवाणे
प्राणाविना देहाला कशास हवे
तेल तुपाने स्नान घालणे ।।

पोटभर नाही मिळाले दोन वेळचे खाणे
जीवनज्योत विझूनी जाता कशास हवे
नैवेद्याचे बहाणे ।।

येता जाता अपशब्दांनी काळीज चिरणे
तेराव्याला कशास हवे
फोटोला हार घालणे ।।

कधीच चुकले नाही कुणास म्हातारपणाचे जिणे
मरणानंतर सोहळे - ओहळे करण्यापेक्षा
जिवंतपणीच द्या रे प्रेम आणि सुंदर जिणे ।।

आई मला जन्म घेऊ दे

नाही जग मी कधी पाहिले
नाही मायबापाचे प्रेम जाणिले
म्हणूनी मज तुज कुशीत वाढू दे
आई, मला जन्म घेऊ दे ।।

हट्ट कधी मी नाही करणार
बाबांना या त्रास ना देणार
फक्त मज कणखर होऊ दे
आई, मला जन्म घेऊ दे ।।

नको मज ते सोने नाणे
नको मज चंगळ खाणे
शिक्षण घेऊनी मोठे होऊ दे
आई, मला जन्म घेऊ दे ।।

काम करून थकून जाशील
अंगात कणकण आजारी पडशील
म्हणूनी तुझीच सेवा नित्य करु दे
आई, मला जन्म घेऊ दे ।।

तुझ्याच अंशाचा मी एक गोळा
नको करू गं मज वेगळा
एकदाच तुझा पान्हा पिऊ दे
आई, मला जन्म घेऊ दे ।।

आजी आजोबांची सेवा करीन मी
तान्ह्यालाही सांभाळीन मी
यासाठी तरी मज येऊ दे
आई, मला जन्म घेऊ दे ।।

तुझ्या दुधाचे उपकार फेडीन
परक्या घरी निघून जाईन
कन्यादानाचे तुज पुण्य मिळू दे
आई, मला जन्म घेऊ दे ।।

काय तरी म्हणावं

भूक भागवण्या
लागते भाकर पोटाले
जगवायची असती
चार पोरं बाळं

पाठीवर घेऊन बिऱ्हाड
पालं मारून राहती
करीत ऊस तोड
गावोगावी हिंडती

नाही भय कशाच
मनी बाळगलं
ऊन, वारा, पाऊसात
संसार थाटलं

ऊस तोडता - तोडता
कुणी होते बाळंतीण
मोळी उचलता - उचलता
कुणी सोडतो प्राण

अशा या नशीबाला
काय तरी म्हणावं
दैवानं दिलं घरदार
तरी आम्ही दोष द्यावं

पैसा

पूर्वी माणसाला जगण्यासाठी
लागत होता का पैसा?

मातीच्या विटांनी
स्वतःच्या हातांनी
बांधायचा तो घर
प्रेमाच्या धाग्यांनी
घट्ट व्हायची नात्याची दोर

स्वतःच्या कष्टांनी
घामाच्या धारांनी
पिकवायचा शेती
पिके डोलू लागताच
त्याच्या घामाचे व्हायचे मोती

पण....

काळ आज बदलला
तो पैशाच्या मागे धाऊ लागला
शरीराची, मनाची नाहीच तमा
नाती झाली इतिहास जमा
याच्यासाठी पैसा जन्मला
पण, त्याच्यापाठी हाच लागला

अमृतापरी देणे

मज पसंत नाही
किड्या मुंग्या सम
जिणे या मरणे
जगास द्यावे
काही तरी
अमृतापरी देणे

शब्द सुमनांच्या माळांनी
मज भरायचेत रकाने
यदाकदाचित
कोणीतरी
उलटून पाहतील
माझी पाने

धन्य - धन्य मी होईन
जेव्हा बरसतील
मजवरी
कौतुकाची प्रेम सुमने
तेव्हा मी ही
एक असेन
जगाच्या फुलातील
दलाप्रमाणे

एक होतं इर्शाळवाडी गाव

सह्याद्रीच्या कुशीत
वसलेलं एक छोटसं गाव ।
इर्शाळवाडी होतं
त्याचं नाव ।।

पण....
अचानक घातला
निसर्गाने घाला ।
डोंगराखाली सारा गाव
जमीनदोस्त झाला ।।

फुटल्या असतील किंकाळया
झाला असेल आक्रोश ।
कोण कोणाचे ऐकणार
उसळला असेल प्रक्षोभ ।।

काडी काडी जमवलेला
स्वतः बरोबरचं संसार गेला ।
आई - बाबासंगे
मुलांचाही जीव गेला ।।

असा कसा झाला
निसर्गाचा कोप ।
घ्यायची होती सुंदर झोप
पण, ठरली ती काळझोप ।।

इथे बसूनचं आमचा
जीव चर्रर झाला ।
मरणाशी झुंज देताना
त्यांचा कसा असेल थरकाप झाला ।।

फक्त, नावापूरतेच राहिले
इर्शाळवाडी गाव ।
सारेच जीवाला मुकले
रंक आणि राव ।।

शतशः वंदन करूया

तुरूंगवास भोगला, रक्त सांडले
झाल्या देहाच्या चिंधड्या ।
शतशः वंदन करूया
हुतात्म्यांना मर्द रांगड्या ।।धृ।।

लहान थोर ही चवताळले
सोलण्या ब्रिटिशांच्या चामड्या ।
चूल फुंकणाऱ्या हातातल्या
खणाणून उठल्या बांगड्या ।।१।।

स्वातंत्र्याचा ध्यास उरी पेटला
झुगारील्या जातीपातीच्या पगड्या ।
गदारोळ माजविण्यास
कित्येकांनी उठविल्या वावड्या ।।२।।

स्वतंत्र झाला भारत जेव्हा
फडकला तिरंगा, उभारील्या गुढ्या ।
वाजले सनई चौघडे
घातल्या मातृभूमीस पायघड्या ।।३।।

मनमुराद जगण्यासाठी

या अथांग गर्दीतून
वाट काढू पाहतेय
स्वतःचं....
अस्तित्व शोधण्यासाठी

अश्रू भरल्या नयनांनी
नजर रोखलेय....
धूसर दिसणाऱ्या
क्षितिजा पलिकडले पाहण्यासाठी

खदखदलेल्या मनाला
शब्दातून....
वाट मोकळी करतेय
मनमुराद जगण्यासाठी

थकलेल्या हातांना आधार

अरे पोरा जरा
समजून घे रे बापाला
तुझ्या ही नकळत तोच तर असतो
कारण तुझ्या यशाला

आईचा ओघळणारा अश्रू
तुला रे कसा दिसतो
पण, हृदयातून भिजलेला बाप
तुला कोरडाच का रे वाटतो?

आईच्या पंखाखालचं
संरक्षण तुला कळतं
पण, बापाचं टोचून बोलणंचं तर
तुला उडायला शिकवतं

जेव्हा सारीच कमाई खर्च व्हायची
तेव्हा काहीच नव्हते रे उरत
पण, त्या गोष्टीची तो
कधी तक्रार नव्हता हो करत

गैरसमजाचं बीज तुझ्या मनातलं
वटवृक्ष होण्याआधीच काढून टाक
त्याच्या दबलेल्या भावनांना
तुझ्या मायेनं झाकून टाक

कारण....
नसतं रे व्हायचं त्याला
तुझ्या मिळकतीचा भागीदार
त्याला फक्त हवा असतो
त्याच्या थकलेल्या हातांना तुझा आधार

अशा आमुच्या देवा

तुचि उठविलीस धूळ
तुचि फुलविला अंगार

चंद्र झाकलास तू
तुचि पसरविला अंधार

निराधार व्हावे म्हणूनी
तुचि काढिला आधार

तुचि खेळतोस सारे
माथी मारतो उधार

लीला कळाव्या तुझ्या
जन्म व्हावा साकार

सरते शेवटी करतो
तुचि आमुचा उद्धार

अशा आमुच्या देवा
तुझा आम्ही करितो जयजयकार

आई

आईच एक ध्यास
आईच तो ईश
आईच्या चरणाशी
मिळे अमरत्वाचा मोक्ष

मिळते जगी काहीही
मिळत नाही आई
आई व्हावयाला
आईशिवाय कोणी नाही

आईचा पिऊनी पान्हा
मोठा होतो तान्हा
आईच्या त्या दुधाची
सर कशाला नाही पुन्हा

आई माझी
मी आईची
आईमुळेच दिसली
सुंदरता जगाची

बाप म्हणजे

बापाचं काळीज म्हणजे
पृथ्वीच्या पोटातील झरा
जो कधी दिसतही नाही
जो कधी आटतही नाही

बाप म्हणजे
घरासाठी झिजणारा उंबरठा
तिथेच तो रोखतो
येणाऱ्या संकटा

बाप म्हणजे दिवसा
मर्दासारखा वागतो
रात्रीच्या अंधारात पोरीसाठी
धाय मोकलून रडतो

बाप म्हणजे ज्याला
मनातलं सारं कळतं
बाप म्हणजे ज्याच्याकडून
न मागता ही मिळत

किती गंमत असते ना नात्यात!

किती गंमत असते ना नात्यात!
कुरघोड्या करत आयुष्य घालवायचं
उणीदुणी काढतं
आयुष्यभर टोकायचं

तुझं - माझं करत
सतत भांडायचं
सरते शेवटी आयुष्याच्या
रक्तानेच, पापणीतून गळायचं

तोंड ही पाहणार नाही
म्हणून पाठ फिरवायचं
सुखरूप आहेस का पाहण्यासाठी
कितींदा मागे वळायचं

किती गंमत असते ना नात्यात
तुझं - माझं जमेना, तुझ्या वाचून करमेना
पाण्याच्या प्रवाहात वार करायचं
आणि म्हणायचं तोडलं तरी तुटेना

कविता

आईची
माया कविता
बाबांचे
काळीज कविता

बालपणीची
नटखट कविता
तारुण्याची
खट्याळ कविता

चाळीशीची
स्मरण कविता
वार्ध्यक्याची
आठवण कविता

जन्माचा
आनंद कविता
मरणाशी
झुंज कविता

नात्यातील
दुवा कविता
प्रेमीकांची
प्रेम कविता

जीवनाचा
श्वास कविता
वाटसरुचा
मार्ग कविता

दु:खीतांची व्यथा
जाणते कविता
सुखी जीवनास
फुलविते कविता

भावनिक जणांचे
स्पंदन कविता
मुक्या जिवाचे
शब्द कविता

गरीबांचे
हाल कविता
श्रीमंतांची
शाल कविता

अपयशाची
रूक्ष कविता
यशाची
साक्ष कविता

दुबळयांचा
आधार कविता
दिनांचा
उध्दार कविता

अन्यायाची
ढाल कविता
न्यायाची
देवता कविता

अत्याचाराची
बोचट कविता
हक्कासाठी
लोचट कविता

सैनिकांचे
शौर्य कविता
राजकारणाची
निती कविता

प्रकोपाची
साक्ष कविता
भ्रष्टाचाराचा
उद्रेक कविता

शेतीचा
बांध कविता
शेतकऱ्यांचा
घाम कविता

निसर्गाचा
बोध कविता
सृष्टीतील
शोध कविता

कणाकणात
दडते कविता
क्षणाक्षणाला
जन्मते कविता

वाव मिळू दे

झटकून टाक धूळ
तुझ्या बुद्धीवरची
दे इशारा मनाला
टाक पुढे पाऊल
करू नको चिंता मागची

जन्माला येऊन
तसेच मरणे
पालापाचोळ्यासम
ते जिणे

नको जीवन असे
बरबाद व्हायला
कुठे तरी वाव मिळू दे
तुझ्यातील कलागुणांला

रांधा वाढा उष्टी काढा
नको असे टिपीकल जगणे
नाती गोती जपता - जपता
तुझ्यातील कला दाखवित जाणे

जिने जगू नको तू
कधी ही लाजिरवाणे
वेळ प्रसंगी संकटाला
धैर्याने सामोरे जाणे

भांडू नको तू, झगडू नको
प्रेमाने जग जिंकता येते
नाती गोती कधी तोडू नको
एकोप्याने सुखी राहता येते

पुढेच पुढे जात रहा
धीर कधी सोडू नको
एखादं दुसऱ्या अपयशाने
खचून कधीही जाऊ नको

ईश्वराचे दान

ईश्वर चरणी मी असताना
चमत्कार एक घडला
अबोल माझ्या मनातून
काव्याचा मोगरा फुलला

कळले न मजला काही
नकळत सारे घडले
कोरड्या माझ्या मनाला
काव्याचा पाझर फुटला

अंध मानवाला मिळावी
अचानक दिव्य दृष्टी
साध्या माझ्या मनावर
काव्याची झाली वृष्टी

अचानक वळीवाच्या पावसाने
तप्त धरती न्हाऊन निघाली
एकाकी माझ्या मनावर
काव्याची बरसात झाली

हे अनमोल ईश्वराचे दान
अलगद माझ्या पदरात पडले
जे ध्यानी मनी ही नव्हते
असे काव्य माझ्या हातून घडले

स्त्री आहेस तरी कोण तू...?

प्रश्न पडतो मनोमनी
स्त्री आहेस तरी कोण तू?
उत्तर शोधताना
दिसतेस क्षणोक्षणी मला तू

आई - बापाची लेक तू
लेकराची आई तू
पतीची पत्नी तू
घराची गृहलक्ष्मी तू

नातवंडांची आजी तू
भावाची बहीण तू
अनेक नात्यांची वीण तू
सजीवांचे जीवन तू

सहनशीलतेची देवता तू
विशाल ह्रदयाची माता तू
सौंदर्याची खाण तू
विश्वाची शान तू

हळवी गाय तू
कणखर ढाल तू
नाजूक नार तू
संकटावर प्रहार तू

मायेचा पाझर तू
प्रेमाचा सागर तू
नात्यांच आगर तू
व्यथेचा गहिवर तू

बुद्धीची शारदा तू
कष्टाची धनदा तू
ज्ञानाचा प्रकाश तू
चराचराचा गुरू तू

विश्वाची उत्पत्ती तू
विनाशाचा अंत तू
हिंसेचा संहार तू
मोहाचा त्याग तू

लखलखणारी वीज तू
चमचमणारी चांदणी तू
तळपणारी तलवार तू
गंधाळणारा सुवास तू

कविचे काव्य तू
गाण्याचे श्राव्य तू
हृदयाचा ठाव तू
प्रेमाचा गाव तू

आदिमाया तू
आदिशक्ती तू

दैत्यांचा संहार करणारी
दुर्गा, महाकाली तू

रणांगणातील रणरागिणी तू
स्वामीची स्वामीनी तू
तांडव करणारी कडकलक्ष्मी तू
स्वर्गातील नर्तकी अप्सरा तू

यमाकडून पतीचे प्राण आणणारी
सती सावित्री तू
तान्हयासाठी बुरुजावरुन उडी मारणारी
शूर हिरकणी तू

रामाची सीता तू
कृष्णाची गीता तू
विरांची विरता तू
निर्मळ सरीता तू

शिवरायांची
जिजामाता तू
पाठीवर लेकराला घेऊन लढणारी
झाशीची राणी तू

श्यामची आई तू
अनाथांची माई तू
ज्ञानोबांची ताई तू
दारीची जाई तू

इंदिरा गांधी तू
मदर तेरेसा तू
किरण बेदी तू
प्रतिभाताई तू

कल्पना चावला तू
सुनिती विल्यम्स तू
पी. टी. उषा तू
सानिया मिर्झा तू

कणाकणात आहेस तू
क्षणाक्षणाला जन्मतेस तू
मनामनात भरतेस तू
यत्र, तत्र, सर्वत्र तूच तू

बघ कधीतरी तुझ्यातली तू
ओळख कधीतरी तुझ्यातली तू
जागव कधीतरी तुझ्यातली तू
आणि जगव कधीतरी तुझ्यातली तू

हे मना, एकदा मजसाठी गाशील का?

सुखाच्या क्षणांनी
सरले आयुष्य भरशील का?
हे मना, एकदा मजसाठी गाशील का? ।।धृ।।

दु:खाच्या धाग्यात गुंफलेत
हळूवार सुखाचे मोती
आठवणींची ही माला
अखंड जपशील का?
हे मना, एकदा मजसाठी गाशील का? ।।१।।

देह झाला जर्जर
डोळयांच्या झाल्या खाचा
उसंत नाहीच कधी घेतली
गाढ निद्रा देशील का?
हे मना, एकदा मजसाठी गाशील का? ।।२।।

आयुष्यभर केला अट्टाहास
अपुरीच राहिली आशा
झटकून टाकण्या निराशा
फुंकर मारशील का?
हे मना, एकदा मजसाठी गाशील का? ।।३।।

शेवटच्या क्षणी आठवे भूतकाळ
सुधारण्याची निघून गेली वेळ
त्या कटु आठवणी जीवनातल्या
पुसून टाकशील का?
हे मना, एकदा मजसाठी गाशील का? ।।४।।

भूतलावर आहे जोवर

भूतलावर आहे जोवर
निसर्ग सुंदर पहावे मनोहर

वादळ वारे घुमत राहणार
ऋतूचक्र ही बदलत राहणार
आपण मात्र रहावे कणखर

पाऊस कधी भिजवून जाईल
नदी कधी कोरडी वाहील
आपण मात्र अढळ निरंतर

उठतील कधी भूकंपारे
फाटतील कधी भूधर
आपण मात्र पहावे लिलयांतर

पोटासाठी

पोटाची खळगी
भरण्यासाठी
आले गाव सोडून
ऊस तोडण्यासाठी

पालं मारून राहिले
मोकळ्या रानात
परं नशीबात नव्हती
निसर्गाची साथ

विजांचा कडकडाट
मुसळधार पाऊस
काय वाटत असेल
त्या परक्या जिवास

बायाबापडी असतील
हतबल झाली
चिल्ली - पिल्ली त्यांची
काकडून गेली

वाऱ्यावरचा संसार
उघड्यावर पडला
पोटासाठी कसा
वनवास घडला

कसला बदल

कंप्युटरच्या या युगात
जग दुनिया सारी दिसली
चार भिंतीमधली आपुलकी
आज आहे रूसली

मोबाईलच्या वेडाने
नाती दुरावत गेली
सेल्फीच्या नादात
जिवाची बाजी लागली

आईची अंगाई
अबोल झाली
डीजेच्या तालावर
बाळाची बोली बोलू लागली

आजीच्या कहाणीची जागा
टी. व्ही. मधल्या कार्टून न घेतली
गृहिणींच्या विचारात
रंगीत मालिका घुसली

बिअरचा घुटका
विडीचा झुरका
नोकरीच्या शोधात
शेती गहाण पडली

तुटपुंज्या कपड्यात
स्त्रिने लाज सोडली
संस्कृतीची अब्रु
वेशीवर टांगली

नोकरीसाठी आई
घराबाहेर पडली
आईच्या दुधाची तहान
बाटलीवर भागली

आजी आजोबांची रवानगी
वृद्धाश्रमात झाली
बाळाच्या प्रेमाची भूक
पाळणाघरात क्षमली

नाती फक्त
नावालाच उरली
मीपणाच्या अहंकारात
सारीच बुडली

प्रगतीसाठी निर्मिती झाली
तिची आम्ही अधोगती केली
कसला बदल म्हणावा हा
जिथे माणुसकीच संपली

आधुनिक महाभारत

महाभारत घडलं
पुराणात विलीन झालं
आजी आजोबांच्या कहाणीत
नावापुरतचं उरलं ।।१।।

सहज आपण म्हणून जातो
पाच पांडवांची द्रौपदी
शंभर कौरवांना आवडली
म्हणूनचं तर शंख ध्वनी निनादली ।।२।।

पण.... आपण हे विसरतो
महाभारत घडलं
म्हणूनचं श्रीकृष्णाने गीता रचली
पण.... आज फक्त कोर्टात
शपथ घेण्यापुरतीच उरली ।।३।।

कारण....
सत्तेचा आणि संपत्तीचा
सर्वांनाच मोह झालाय
वासनाधीन माणसाला
नात्याचाही विसर पडलाय ।।४।।

पाच पांडव आणि शंभर कौरवांचचं
महाभारत घडलं होतं
द्रौपदीच्या एका वस्त्रासाठी
महायुद्ध लढलं होतं ।।५।।

आज देशात पुन्हा एकदा
शंभर कौरव आणि पाच पांडवांच्याच
आधुनिक महाभारताचा आरंभ झालाय
आज हजारो स्त्रिया विवस्त्र होताहेत
मग, किती वेळा हवेत शंख फुंकाय ?।।६।।

एक कौरव जन्मला
की नव्व्यानव कौरव घडताहेत
पण.... एक पांडव जन्मला
की चार शोधावे लागताहेत ।।७।।

म्हणूनचं....
आज गरज आहे देशाला
कृष्णासारख्या सारथ्याची
अर्जूनासारख्या योध्याची
धर्मराजाच्या नजरेची
भीमाच्या शक्तीची
आणि
नकुल सहदेवांच्या सहनशीलतेची ।।८।।

तरच कुठेतरी,
कुविचाराचा नायनाट होईल
भ्रष्टाचाराला आळा बसेल
अन्याय, अत्याचाराची
होळी होऊन,
देशात प्रेम शांततेची
दिवाळी दिसेल ।।९।।

एक दिवस तिचा ही

विना तक्रार
न थकता
सर्वांच करता - करता
वाटतं तिलाही,
काळजी घ्यावी
कोणीतरी आपलीही
म्हणूनचं....
असावा एक दिवस तिचाही

घर आणि नोकरी
तारेवरची कसरत
थकून जातो जीव
तेव्हा वाटत तिलाही
मायेचा हात फिरावा
पाठीवर आपल्या ही
म्हणूनचं....
असावा एक दिवस तिचाही

मुलांची अभ्यासाची घाई
पाहुण्यांची सरबराई
तिलाच सांभाळायची असते
तेव्हा वाटत तिलाही
शाब्बासकीची दाद मिळावी

क्षमा करावी चुकीला ही
म्हणूनचं....
असावा एक दिवस तिचाही

सर्वांची मनं जपता - जपता
स्वतःचं मन मारून
जगावं लागतं
तेव्हा वाटत तिलाही
असावं कोणीतरी
मन ओळखणारं आपलंही
म्हणूनचं....
असावा एक दिवस तिचाही

कवितेशी मैत्री

जेव्हा कधी उसंत घेते
सहज भूतकाळात डोकावते

सुखाच्या आठवणीने
कधी सुखावते
दु:खाच्या क्षणांनी
हृदय ओलेचिंब होते

कधी यश ओंजळीत
बसत असता
हृदयात चर्रर्रर्र होते
ते हातून निसटून जाता

किती स्वप्ने पाहिली, रंगवली
पण, ती स्वप्नातच विरघळून गेली
मैत्री मात्र कुणाशी नाही
कवितेशी घट्ट झाली

का न सुंदर जीवन जगावे

यशाच्या उंबरठ्यावर असताना
अपयशाने का दार उघडावे
सुखाचा घडा भरत असताना
दु:खाने का ओथंबून वहावे

तहानेने व्याकूळ होता
पाण्याने का मृगजळ व्हावे
भुकेचा आगडोंब उसळता
अन्नाने का नासून जावे

आनंदात आपण असताना
दुसऱ्याने का कटू व्हावे
सर्वच वाट्याचे भोग भोगता ही
का न सुंदर जीवन जगावे

ध्येय

माझ्या सुखाच्या वाटेवर
कुणी पेरीलं काटं
नाही परवा कशाची
तेच दाखवती वाट

रूतलं काटं किती जरी
तरी व्हायचं धीट
लक्ष ठेवायचं समोर
लावायची ध्येयाकडे टकं

कधी पायाले स्पर्शली
फुलांची देटं
नाही तरी थांबायचं
गाठायचे टोकं

माझे जगणे

दाटून मनी आला
भावनांचा महापूर
नकळत जुळले
एकमेकांचे सूर

मुलगी होते जेव्हा
लाडकी आई बापाची लेक
लग्नानंतर झाले
पत्नी मी नेक

आई - आई म्हणूनी
मुले बागडू लागली
पदराखाली माझ्या
सावली शोधू लागली

वाटते मज आता
आभाळ ही ठेंगणे
कारण माझी मुलेच
असतील माझे जगणे

तुझ्यातली तू

मरगळलेल्या मनाला
उल्हासित कधी करशील का?
अस्तित्वाला तुझ्या
जाग कधी आणशील का?
अगं सांग वेडे
तूच तुला कधी ओळखशील का?

जग फार सुंदर आहे
डोळे भरून कधी पाहशील का?
संसाराच्या रामरगाड्यातून
मोकळी कधी होशील का?
अगं सांग वेडे
तू तुझ्यासाठी जगून कधी पाहशील का?

मायेच्या डोहातून
दूर कधीतरी जाशील का?
एकांतात एकटीच कधीतरी
मनमुराद हसशील का?
अगं सांग वेडे
तुझ्यातली तू कधी अनुभवशील का?

नशीबाचं लक्तर

नशीबाच्या लक्तराला
ठिगळं जोडावी किती
आयुष्य सारं सरत आलं
अजून झिजावं किती? ।।धृ।।

पायाखालची वाट सारी
झिजूनीया गेली
पोटासाठीच कष्टतो आहे
नाही आशा कसलीच उरली
मावळलेला सूर्य ही उद्या
नव्या प्रकाशाने उजळतो आहे
मी मात्र अजून झुरावं किती? ।।१।।

रंकाचा राव ही झाला
कधी रावाचा रंक
अनेकांना मोजण्यास पैसा
कमी पडताहेत अंक
कधी उघडतील आमुच्या
नशीबाची कवाडे
अजून वाट पहायची किती? ।।२।।

मुका जीव

भयानक पुराने
घातले थैमान
पै - पैचा संसार
गेला क्षणात वाहून

जीव वाचवण्यासाठी
गेले होडीतून, कोणी पोहून
गोठ्यातली जनावरे
राहिली तशीच बांधून

मुक्या जीवाला त्या
काही बोलता नाही आले
आलेल्या मरणाला
सहज सामोरे गेले

अनुभवाचे चित्र

आई ही देवी
वडील हे देवता
परमेश्वर ही कर टेकतो
त्यांची पुजा करिता

आई ही वेल
वडील ही मुळे
मुलांच्या साठी शोषतात
जमिनीखालील तळे

आईचे चारित्र्य
वडीलांचे पावित्र्य
मुलांच्या साठी तयार करते
अनुभवाचे चित्र

मी

खेड्यामधली मी अडाणी
खेडवळ माझी वाणी
रूढी परंपरागत जुनी पुराणी
आहे माझी विचार सरणी

हे घरची माझे विश्व
अशी मी गृहिणी
विज्ञानाच्या युगात ही
आहे अजून अज्ञानी

तरीही वाटले....

कल्पनेचे पंख लावून
यावे एकदा विश्व फिरुनी
प्रत्येकाच्या मनामनात
पोहचवेल आपली लेखणी

मला ही पाहू दे एकदा
विज्ञानाशी नाते जोडूनी
घ्यावी एकदा उंच भरारी
बंध सारे तोडूनी

घर - संसारातच पडलेय
अजून ही अडकूनी
तरीही आज थोडी सुखावलेय
तुमच्यापर्यंत पोहचूनी

अरे संसार - संसार!

अरे संसार - संसार!
किती लाविलासी घोर
ओझे केले हलके तरी
कमी होईना रे भार

अरे संसार - संसार!
किती केला अट्टाहास
आयुष्य सारे सरले तरी
पुरी होईना रे आस

अरे संसार - संसार!
किती जीव हा कष्टला
नाही घेतली उसंत
तरीही कमी वाटे रे जीवाला

अरे संसार - संसार!
किती वढावा रहाट
जिव थकला तरीही
इच्छा राही रे अर्धवट

अरे संसार - संसार!
कसा करावा नेटका
किती ठिगळे जोडली
तरी ही का रे फाटका

अरे संसार - संसार!
जणू जुगार मटका
जीव जीवाला लावला
तरी ही का रे चटका

अरे संसार - संसार!
कसा लागे झटका
सावरता - सावरता
जिव पडे रे लटका

अरे संसार - संसार!
का रे झालास फुका
आयुष्य सारं सरलं
राहीलास जितका तितका

अरे संसार - संसार!
सारे खेळलास तुचि डाव
मनातल्या ईच्छांना
नाही मिळाला कुठे वाव

अरे संसार - संसार!
थकून गेला जीव, तुझा वढता रहाट
कधी उजेडणार आता
नवी सुखाची पहाट

अरे संसार - संसार!
किती करावा अट्टाहास
केला रातीचा दिस
तरी अधूरी सुखाची आस

का नको मुलगी

घरात असावी आई आपुली
अनुभवाचा घडा भरलेली
योग्य वेळी सावरतेली

घरात असावी बहीण आपुली
लटक्या लटक्या लाडाने
घर भरून जाईल असली

घरात असावी पत्नी आपुली
संसाराच्या सुख - दुःखात
सदैव साथ देतेली

का नको मुलगी, पोटी जन्मलेली?
चाहूल लागताच तिची
का हत्या करण्याची मनी आली?

तुमच्याच प्रेमाचा अंकुर असलेली
तुमच्याच प्रेमाचा दुवा ठरलेली
का नको मुलगी झालेली?

मुलगी जेव्हा मोठी होते

मुलगी जेव्हा मोठी होते
आईला समजून घेते
तिच्या मनातील व्यथांची सल
तिलाच तर कळते

मुलगी जेव्हा मोठी होते
बाबांच्या कष्टाची झळ तिलाच पोहचते
हवं असते भरपूर काही
पण, काहीचं नको असं भासवते

मुलगी जेव्हा मोठी होते
घराला घरपण येते
आजी आजोबांच्या जगण्याचा
तिचं तर आधार ठरते

पण.... मुलगी जेव्हा मोठी होते
परक्या घरी निघून जाते
तिच्या साऱ्या अवखळ खोड्या
माहेरच्या अंगणात ठेवून जाते

त्याने ही एकदा म्हणावे

ताट भरून वाढले तरी
सतत त्याला विचारते
"अजून काय हवे?"
एकच अपेक्षा असते
"तू ही बस माझ्या सवे."
त्याने ही एकदा म्हणावे

साज शृंगार करता
"खूप छान दिसतेस!"
कित्येकांनी म्हणावे
पण, तिला मात्र वाटते
हेच शब्द
त्याच्या तोंडून ऐकावे

फार काही अपेक्षा न ठेवता
तिने थोडे रूसावे
सुख - दुःखात साथ देताना
प्रेमात त्याच्या भिजावे
"फार अभिमान वाटतो तुझा"
त्याच्या कौतुकातून कळावे

काया, वाचा, मनाने
त्याच्या चरणी समर्पित व्हावे
काही चुकलेच तर
त्याने सांभाळून घ्यावे
तिच्या एका निखळ हास्याने
त्याने तिच्यावर भरभरून प्रेम करावे

दुःख अनावर झालं तेव्हा

दुःख अनावर झालं तेव्हा
मन ढसा - ढसा रडलं
ते इतकं रडलं
पण.... कुणालाच नाही कळलं
कारण, ओठांवरच्या हास्यामागे
होतं ते दडलं ।।धृ।।

शब्दांचे बाण मनात रूतलं
मन सारं कापत गेलं
घायाळ मन
रक्तबंबाळ झालं
तेव्हा मन ढसाढसा रडलं
ते इतकं रडलं.... ।।१।।

आईची आठवण झाली
बाबांची माया कळली
भावासंगे भांडल्याची
चूक उमगली
मन छिन्नभिन्न झालं
तेव्हा मन ढसाढसा रडलं
ते इतकं रडलं.... ।।२।।

जन्म देणारे, वाढवणारे
परके होतात
कोण कोणाचे माहीत नसतानाही
आपले होतात
पण.... काळजातल्या त्या माणसांना भेटण्यासाठी
मन ढसा - ढसा रडलं
ते इतकं रडलं.... ।।३।।

आईची सहनशीलता आठवली
बाबांची काटकसर उमगली
दु:खात असतानाही मला फूलवलं
पण, ते मला तेव्हा नव्हतं कळलं
म्हणून मन ढसा - ढसा रडलं
ते इतकं रडलं.... ।।४।।

आभार मानते त्या माता - पित्यांचे
ज्यांनी दु:खातही हसायला शिकवलं
आभार मानते त्या परमेश्वराचे
ज्याने मला त्यांच्या ओटीत घातलं

त्यांच्या संस्काराचे मोरपीस मनावर फिरलं
तेव्हा मन ढसाढसा रडलं
रडून - रडून मलिन मन
स्वच्छ झालं, कणखर बनलं
तेव्हा ते नेहमीच हसत राहीलं.... ।।५।।

माय - लेकरू

माय लेकराची भिडता
नजरेला नजर
वाहतो तेव्हा
मायेचा महापूर

नसे त्याला
कशाचीच तोड
हे मायलेकरातील
वात्सल्याचे गूढ

कासवापरी कळते
भूक लेकराची
हवी त्याला ऊब
आईच्याच पदराची

माय लेकराच्या प्रेमाला
दृष्ट लागू नये कुणाची
अशीच वाहू दे ही
वाहती नदी प्रेमाची

एकदा तरी वळवून बघ

एकदा कधीतरी
बापाच्या जागी राहून बघ
नाहीच कळलं तरी चालेल
पण.... एकदा तरी वळवून बघ ।।धृ।।

त्याने सोसलेल्या वेदनांची कळ
एकदा कधीतरी सोसून बघ ।
त्याच्या मनाच्या जखमांवर
एकदा कधीतरी फुंकर घालून बघ ।।
नाहीच कळलं तरी चालेल
पण.... एकदा तरी वळवून बघ ।।१।।

ओझे वाहिलेल्या खांद्यांना
एकदा मायेचा स्पर्श करून बघ ।
त्याच्या कोसळत्या मनाला
एकदा कधीतरी आधार देऊन बघ ।।
नाहीच कळलं तरी चालेल
पण.... एकदा तरी वळवून बघ ।।२।।

त्याच्या हृदयाची विशालता जाणण्यासाठी
एकदा त्याच्या भूतकाळात डोकावून बघ ।
जो बाप कधी पाहिलाच नव्हतास
एकदा कधीतरी तो अनुभवून बघ ।।
नाहीच कळलं तरी चालेल
पण.... एकदा तरी वळवून बघ ।।३।।

त्याच्यासारखा कणखर कणा
एकदा कधीतरी वाकवून बघ ।
डळमळत्या घराला
एकदा कधीतरी सावरून बघ ।।
नाहीच कळलं तरी चालेल
पण.... एकदा कधीतरी वळवून बघ ।।४।।

त्याच्या ओघळत्या अश्रूंना
एकदा कधीतरी टिपून बघ ।
त्याच्या झिजलेल्या चरणावरती
एकदा कधीतरी नतमस्तक होऊन बघ ।।
नाहीच कळलं तरी चालेल
पण.... एकदा तरी वळवून बघ ।।५।।

हे धरणी माय

हे धरणी माय
तुझ्या मनी हाय काय ।।धृ।।

कुठे पाऊस कोसळे मुसळधार
वाहूनी जाती घर संसार
कुठे टिपूस ही नाही प्यायला
तिथे कसली वसूली उधार
हा कसला तुझा न्याय ।।१।।

कुठे बुडाला प्रांत अंध:कारात
कुठे जाहली बेचिराख
कुठे निसर्गाचे थैमान
कुठे धुमाकूळ घालती हैवान
माणसांनी खाल्ली तिथे हाय ।।२।।

नको अशी निष्ठूर होऊ
तुझीच लेकरे,पाहती कुशीत येऊ
या तुझ्या अगाध लीला
थांबव आता थोड्या जरा
होऊ दे आता सुखाचा उदय ।।३।।

सैनिकी परंपरेचे गाव (सैनिक टाकळी)

सैनिक टाकळी गाव माझे
सैनिक टाकळी गाव हो ।
इतिहासाच्या पानावरती
परंपरेचे नाव हो ।।धृ।।

आज्जा लढला, शहीद झाला
शत्रूला हुलकावूनी ।
नातू ही पुढे सरसावला
डोळ्यात तेल घालूनी ।।
या परंपरेची रीत चालवा । तुम्ही नव जवान हो ।।१।।

माते गहिवरू नको
अश्रू ढाळू नको कधी ।
पोटी तुझ्या मी जन्म घेतला
अभिमानाने सांग तू ।।
पुत्र माझा जवान झाला । सीमेवरती लढावया हो ।।२।।

सौभाग्याचे दान दिले
झाले बलिदान हो ।
विधवा म्हणूनी जगू नको
अखंड सौभाग्यवती तू ।।
ईश्वर चरणी जवानांसाठी । सदैव मागा वरदान हो ।।३।।

शिवछत्रपतींचे पुत्र आम्ही
मागे नाही हटणार ।
शक्तिपेक्षा युक्तिनेच
सदैव लढत राहणार ।।
राम, कृष्ण ही विसरून जावा । विसरू नका जवान हो ।।४।।

रक्ताचा जरी पडला सडा
चवताळूनी पुढे जाणार ।
शत्रूला चितपट करूनी
त्याला धूळ चारणार ।।
देशाच्या माथ्यावरती । तिरंगा फडकविणार हो ।।५।।

या देशाचे रक्षक आम्ही
आहे छाती आमूची निडर ।
एकटा जरी असेन तरी
दहा जणांना पुरून उरणार ।।
भारतभूच्या मातीचेच । आम्ही सारे जवान हो ।।६।।

लढताना जरी आले मरण
अमर होऊनी राहणार आम्ही ।
नवजवानांच्यामधील
चैतन्य बनून जगणार आम्ही ।।
रक्त आमूचे सळसळणारे । ऊफाळूनी वरती येणार हो ।।७।।

सांग लेकरा ......

सांग लेकरा, तुज आईची -
पुण्याई कमी कुठे पडली
पोटच्या गोळ्याची छिन्नविछिन्न अवस्था
लेकरा, या डोळ्याने की रे पाहिली ।।धृ।।

तुज लागता ठेच वेदना
काळजास पोचत होती
तुझ्या देहाचे तुकडे होताना
मज कशी लागली निद्रा गाढ ती
भारत मातेच्या ओटी । पुत्र माझा घातला
तिने तर त्याची काया । तिरंग्यात लपेटून घेतली ।।१।।

थांब! सांगत होते तुजला
का गेला ओलांडून मजशी?
काय सांगू आता मी
तुझ्या बायको नं मुलांशी
अजून तुझी ओळख ही । झाली नव्हती त्यांना
तोवरी कोणी दुष्टाने बहरलेली । माझी वेल खुडून टाकली ।।२।।

असा कसा रे सोडून गेला
मजशी रे तू कान्हा
या आईचा आज अचानक
कसा गोठूनी आला पान्हा
नव्हते मी रे जिजाई । होते फक्त तुझीच आई
तुजशी मागे सारूनी लेकरा । घेतली असती करूनी या देहाची खांडोळी ।।३।।

ओठांची अंगाई अजूनी
विसरलीच नाही
अंगणातली दुडकी पाऊले
अजूनी पुसलीच नाही
तोवरी लेकरा, इतकी का तु घेतली । उंच भरारी
आता कुठे शोधावी या माऊलीने । तुझी साऊली ।।४।।

हट्ट तुझा मी किती पुरविला
तसा तु मजशी लळा लावीला
जायचे होतेच मला सोडूनी
लेकरा, का मग माझ्या पोटी जन्मला
मातृत्वाची भूक माझ्या । अर्धी की रे राहिली
भरलेली कूस माझी । आज रिकामी की रे झाली ।।५।।

ये रे येलेकरा माघारी
वेडी आई ही तुझी वाट पाहते
लगबगीने तु जाताना
दृष्ट काढणे राहीले होते
राहीलेल्या अर्धवट स्वप्नांचे मनोरे । पूर्ण करूनी जा लेकरा
तसाच ऊठूनी ये धाऊनी । वाट पाहतेय ही माऊली ।।६।।

पाषाणी देव

पाषाणाच्या देवळातला
पाषाणी देव तू
हृदयाला तुझ्या पाझर
फुटणार कधी सांग तू ।।धृ।।

तूच माझा श्वास अन्
तूच माझा ध्यास तू
तिथेच घातलेस का
अखंड रे घाव तू ।।१।।

माथा ठेवून - ठेवून चरणी
चरणी झिजून गेलास तू
हात ही झिजाया
डोक्यावर कधी ठेवणार तू ।।२।।

मूर्ती मध्ये नको बसू
पाठीशी उभा रहा तू
धैर्य येईल लढायाला
देशील जेव्हा साथ तू ।।३।।

आहेस प्राण तू
जीवन ही तूच तू
असे असूनही
का रे लपलास तू ।।४।।

हाक देतेय हाकेला
साद रे घाल तू
अंत नको पाहू आता
दाखव तुझा ठाव तू ।।५।।

येरे - येरे येरे येरे
येरे - येरे देवा तू
करून दे सर्वांनाच
अस्तित्वाची जाणीव तू ।।६।।

म्हणून तुझ्याकडे धाव घेतली

कोरड्या चटणी सोबत
शिळी भाकरी खाल्ली
दुसऱ्याच्या जुन्या कपड्यांनी
काया लपेटून घेतली

काट्या - कुट्यांची वाट
अनवानी तुडवली
तरी तुझ्याकडे तक्रार नाही केली
तुझ्या चरणी फक्त फुलेच वाहिली

केली पारायणे, केली बहु उपोषणे
नामाची तुझ्या लाखोली लिहिली
देव्हाऱ्यात पुजण्यापेक्षा ही
जास्त हृदयात जागा दिली

भरभरून दे म्हणून
कधी याचना नाही केली
कठोर परिश्रमाला फक्त
यशाची जोड मागितली

निर्गुण, निराकार मूर्तीकडे तुझ्या
आशेने टकं रे लावली
बघ एकदा आमच्याकडे
उघड्या डोळयांवर तू झापडे का रे बांधली?

सुखकर्ता म्हणून कथा वाचली
दुःख हर्ता म्हणून किर्तने ऐकली
मला ही येऊ दे याची प्रचिती
म्हणून तुझ्याकडे धाव घेतली

तिथेच असते परीक्षा

घोंगावती संकट जेव्हा
नसते कोणीच करण्या रक्षा
तिथेच असते परीक्षा
तिथेच असते परीक्षा

चूक नसतानाही
विनाकारण होते शिक्षा
तिथेच असते परीक्षा
तिथेच असते परीक्षा

भोग भोगून ही संपत नाहीत
होते तेव्हा उपेक्षा
तिथेच असते परीक्षा
तिथेच असते परीक्षा

गरज असतानाही
अपूर्णच राहते अपेक्षा
तिथेच असते परीक्षा
तिथेच असते परीक्षा

जीवावरच ओझं

गुळकरी येती
ऊस तोडणीला
आणती बैलं
जुंपून गाडीला

गाडी वढती चिखलात
रणरणत्या उन्हात
ओझं वाहती टनाचं
जीव घेऊन मुठीत

निघे हातभार जीभ
गाडी वढताना
आडके पायात पाय
गाडी हाकताना

ओझं वडून - वडून
ऊर फुटून मरती
धन्यासाठी आपल्या
प्राण बी सोडती

सैनिक माझ्या बांधवांना

सैनिक माझ्या बांधवांना
ओवाळीते ही एक बहिणा ।
उदंड आयुष्य मिळो म्हणूनी
ईश्वरचरणी अखंड प्रार्थना ।।धृ।।

आम्हास मिळावी शांत झोप म्हणूनी
राहता सीमेवरती तटबंध होऊनी ।
रक्षण करता देशाचे
छातीची ढाल करुनी ।।
या रक्षणकर्त्या बांधवांना
ओवाळीते ही एक बहिणा ।।१।।

विसरुनी जाता स्वतःचा परिवार
कर्तव्याची एकच भावना ।
माझा भारत माझे कुटुंब
करारी सदैव तुमचा बाणा ।।
अशा सीमेवरच्या बांधवांना
ओवाळीते ही एक बहिणा ।।२।।

आला पहा दिवाळीचा सण
करीत आनंदाची उधळण ।
सीमेवरती सैनिक मात्र
धरताहेत शत्रूला रोखून ।।
अशा शूर-वीर बांधवांना
ओवाळीते ही एक बहिणा ।।३।।

चिलखत सैन्याचे

भारतभूच्या अंगावरती
चिलखत चढले सैन्याचे
खुपणाऱ्याच्या डोळयांमध्ये
काटे मोडले बोराटीचे ।।धृ।।

चिलखतावर घाव घालशील
अर्धमेला तुचि होशील ।
दंड थोपटून उभा राहशील
तूच तुझ्या जीवास मुकशील ।।
उल्लंघन कधी करु नको । पालन कर मर्यादेचे ।।१।।

भारत माता आहे माझी
शूर लढवैय्या योध्यांची ।
किती आले किती गेले, एकजूटीची परंपरा
आहे माझ्या देशाची ।।
कमजोर आम्हा समजू नको । मावळे आम्ही शिवरायांचे ।।२।।

भारतमातेच्या रक्षणार्थ
देह जाळीला मातीचा ।
वास त्यांचा सदैव आहे
त्यांच्या अमर बलिदानाचा ।।
या मातीतचं जन्म घेवूनी अनेक जाहले । रक्ताच्या एका थेंबाचे ।।३।।

भारत माता आमची आहे
आमचीच ती राहील ।
दुष्ट दुर्जनांचा संहार करण्या
स्त्री शक्ती ही पुढे येईल ।।
डाव आम्ही हाणून पाडू । नतद्रष्ट शत्रूचे ।।४।।

सुख - सुख म्हणताना

सुख - सुख म्हणताना
त्याने का पुढे पळावे
दु:खाकडे पाठ फिरविता
त्यानेच का पुढे यावे

तहानेने व्याकूळ होता
सुखाने मृगजळ व्हावे
दु:खाच्या तळपण्याने
देहाने करपून जावे

सुख हे असेच आहे
पाऱ्यासम,
ओंजळीत न यावे
दु:ख हे असेच आहे
चिवट, कधीच न तुटावे

शिवरायांचे मावळे

अश्वारूढ शिवरायांचे
प्रतिक गावा लाभले ।
सैनिक टाकळी गावाने शौर्याचे
गीत नेहमीच गायले ।।धृ।।

शहीद जवानांचे स्मारक
नवजवानांची स्फुर्ती
जन्मा आधीच ऐकून येतात
वाडवडलांची कीर्ती
शिवरायांची घेऊन शपथ
होतात सैन्यात भरती
जयजयकाराचा देत नारा । पुढेच पुढे सरसावले ।।१।।

वाटते इथेच जन्मा आले
शिवरायांचे मावळे
तिच धडाडी, तिच उम्मेद
शौर्याचे ही तेच उमाळे
छातीवरती झेलल्या गोळया
पण, अश्रू ना गळे
देशासाठी घर संसार । वेशीवरती टांगले ।।२।।

या मातीतचं रूजली आहे
शौर्याची गाथा
अठरा जवान शहीद होऊन ही
अखंडित आहे परंपरेची वीरता
वीरपत्नी, वीरमातांनी जीवन कंठले
वनवासाचे भोग भोगता
पोटचा गोळा, सौभाग्याचा टिळा । देशासाठी वाहिले ।।३।।

पुन्हा नव्याने

जुन्याच काही स्वप्नांमध्ये
रंग नव्याने भरायचे
मरगळलेल्या मनाला
नव्याने उत्साहित करायचे

जुन्याच गोड क्षणांना
पुन्हा नव्याने जगायचे
नव नवीन स्वप्ने पाहत
ध्येय आपुले गाठायचे

थकलेल्या पंखांना
बळ नव्याने द्यायचे
उंचच उंच भरारीसाठी
जोमाने पंख पसरायचे

हेवेदावे, दु:ख सारे विसरूनी
नव्याने गोड हसायचे
नात्यातील दुराव्यामध्ये
नव्याने एकरुप व्हायचे

कटू सारे विसरण्यासाठीच
नवे असते स्वीकारायचे
जुन्याला अनुभवाच्या कुपीत ठेवून
नवीन वर्षाचे स्वागत करायचे

14 Arial Unicode MS Words 6,576

OFFICIAL ALLOTMENT OF ISBN NUMBER

Raja Rammohun Roy National Agency for ISBN
Department of Higher Education, Ministry of Human Resource Development
Government of India

Applicant Type: Publisher Edit Profile My Application Change Password Log Off

RAJA RAMMOHUN ROY NATIONAL AGENCY FOR ISBN

DEPARTMENT OF HIGHER EDUCATION, MINISTRY OF EDUCATION

GOVERNMENT OF INDIA

Raja Rammohun Roy National Agency for ISBN

Book Details

Book Title	Kalpaaneche Pankh कल्पनेचे पंख (काव्यसंग्रह)
ISBN Number	978-81-949979-5-5
Trade Name (Imprint)	KavitaSagar Sahitya Akademi
Name of Publishing Agency	KavitaSagar Publishing Agency, Jaysingpur
Language	Marathi
Country of Publication	INDIA
Product Composition	Single-component retail product
Product Form	Paperback / softback
Date of Publication[DDMMYYYY]	31/12/2023
Edition	01st - First
Type of Author/Editor	Author
Author/Editor	Mrs. Varsharani Rajaram Sawant (Poetess)
Co-author/Co-Editor	